# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Ration Material**

**Police Station** :- **Karanja City**

**Date of Good Work done** :- **05/02/2023**

**Brief of the work done :-**

रेशन धान्याचा काळाबाजार करणाऱ्यावर धाड ; 9 लाखांचा मुद्देमाल जप्त.

लोकमत

## रेशन धान्यासह ९.१२ लाखांचा ऐवज जप्त



लोकमत न्यूज नेटवर्क

**कारंजा लाड :** काळ्याबाजारात नेण्यात येत असलेले रेशनचे १९ टन तांदूळ आणि १ टन गहू कारंजा ग्रामीण पोलिसांनी तपोवन शिवारात पकडले. या कारवाईत रेशनचे १.९७ लाखांचे धान्य आणि वाहनासह ९.१२ लाखांचा ऐवज पोलिसांनी जप्त केला असून, पुढील कारवाईसाठी पुरवठा विभागाकडे पत्रव्यवहार केला आहे.

कारंजा ग्रामीण पोलिसांच्या हद्दीतील तपोवन शिवारात एक इसम जीवनावश्यक धान्य रेशनचे गहू, तांदुळाचा साठा करून काळाबाजारी करत असल्याची गुप्त माहिती ३ फेब्रुवारी रोजी पोलिसांना प्राप्त झाली होती. उपविभागीय पोलीस अधिकारी जगदीश पांडे यांनी पथकासह तेथे पंचासमक्ष छापा टाकला. त्यावेळी तपोवन शिवारात एका शेतात सलीम भिकाजी बाळापुरे, अलीम सलीम गुंगीवाले, तोहीद हसन भवानिवाले या तिघांच्या ताब्यात अवैध विनापरवाना शासकीय स्वस्त धान्य दुकानात वितरित करण्यात येत असलेला गहू-तांदुळाचा साठा चारचाकी वाहनामध्ये भरून ठेवल्याचे आढळून आले. त्यांना धान्याचा परवाना व कागदपत्रांची मागणी केली असता ते कोणत्याही प्रकारचा परवाना व कागदपत्रे सादर करण्यास असमर्थ ठरले. त्यामुळे पोलिसांनी पंचासमक्ष १९ टन तांदूळ किंमत अंदाजे १,९०,०००/- रुपये, १ टन गहू किंमत अंदाजे ७००० रुपये व एक टाटा कंपनीचे वाहन एमएच २९, बीई ४३८२ अंदाजे किंमत ७,००,०००/- रुपये व एक दुचाकी एमएच ३७-१७५७ अंदाजे किंमत १५,००० रुपये असा एकूण ९,१२,०००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई पोलिस अधीक्षक बच्चन सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलिस अधिकारी, कारंजा जगदीश पांडे यांच्या पथकाने पार पाडली.